सारांश (synopsis)

"मराठवाडयाच्या अधिकोषण प्रणालीत महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूरचे योगदान (२००५-०६ ते २०१५-१६)"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच्.डी. पदवीकरिता सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

- : संशोधक :-

श्री. सचिन मारोतीराव म्हैसलवार

लातूर

- : मार्गदर्शक :-

प्रा. डॉ. रमेश पुंडलीकराव साळी

अर्थशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर

ता. चाकूर जि. लातूर

मार्च - २०१६

मराठवाडयाच्या अधिकोषण प्रणालीत महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूरचे योगदान (२००५-०६ ते २०१५-१६)

- **प्रस्तावना :**

देशातील मुद्रा, व्यापर, उद्योग, किंमती या संदर्भातील महिती बँक संकलीत करीत असते. यावरुन देशाची आर्थिक स्थिती, आर्थिक निती, मौद्रीक धोरण कशा पध्दतीचे असेल या संदर्भातील मार्गदर्शन बँक करते. त्याचबरोबर संबंधीत माहिती प्रकाशित करीत असते. यामुळे ग्राहकांना आर्थिक धोरण कशा पध्दतीचे असेल याची माहिती मिळते. त्यातून अनेक प्रकारचे उद्योग, व्यापर, व्यवसाय या संदर्भात व्यवहार पार पाडत असतात. आज प्रत्येक देशाची मध्यवर्ती बँक आहे. देशाची मध्यवर्ती बँक ही त्या देशाच्या वित्तीय सार्वभौमत्वाचे व स्थैर्याचे प्रतीक समजली जाते. मध्यवर्ती बँक ही अशी संस्था असते की जी देशाची वित्तीय ताकत व स्थैर्याला संरक्षण देण्यास जबाबदार ठरते.

अर्थव्यवस्थेतील उद्योग, व्यापार, व्यवसायिक यांना अल्पकालीन कर्ज अनेक कारणासाठी आवश्यकता निर्माण झालेली असती की, कर्ज वेळेवर उपलब्ध झाले नाही. तर उद्योग, व्यापार बंद पडण्याची शक्यता असते. बँकामुळे प्रत्येक गावामध्ये, शहरांमध्ये कर्ज उपलब्धीच्या सोयी निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे आवश्यक त्यावेळी वेळेवर कर्जाची उपलब्धता गरजू व्यवसायातील, व्यापारी, उद्योजक यांना होत असते.

सहकारामध्ये बँकही एक महत्त्वपूर्ण अशी सामाजिक संस्था आहे. कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात बँकांचा वाटा महत्त्वपूर्ण आहे. आज भारताची अर्थव्यवस्था मुक्त अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करताना सहकारी वित्तसंस्था व सहकारी चळवळ ही सामान्य आर्थिकदृष्टया दुर्बल, ग्रामीण, निमशहरी, शहरी नागरिकांना वित्तीय मदत व सुरक्षिततेसाठी आशास्थान ठरत आहे. कारण देशाच्या सर्वांगिण वाटचालीत एकाशतकापेक्षा अधिक वर्षापासून सहकारी चळवळ महत्त्वपूर्ण भूमिका बजावित आहे.

यात नागरी सहकारी बँकाही महत्त्वाच्या वळणावर पोहोचल्या आहेत. देशातील सर्व बँकाच्या ठेवीपैकी ११ टक्यांच्या जवळपास ठेवी नागरी सहकारी बँकांनी जमविलेल्या आहेत. तसेच त्यांचा कर्ज व्यवहार एकूण कर्ज व्यवहाराच्या जवळपास १२ टक्यांपर्यंत पोहोचला आहे.

भारतात श्री विठ्ठल लक्ष्मण कवठेकर या महाराष्ट्रीयन माणसाने ५ फेब्रुवारी १९८९ रोजी अन्योन्य सहकारी मंडळ नावाची हीच संस्था भारतातील नागरी सहकारी बँकेच्या स्थापनेची प्रथम सुरुवात होय. असे असले तरी खऱ्या अर्थाने १९०४ च्या सहकार कायद्याने वैधानिकदृष्टया सहकारी चळवळ भारतात सुरु झाली. पुढे १९१२ चा कायदा, १९१५ च्या मॅक्लेगन समितीच्या शिफारशी, १९४९ चा बँकींग नियमन कायदा यामुळे भारतात नागरी सहकारी बँकांची सुरुवात झाली व त्यांची गुणात्मक व संख्यात्मक वाढ होऊ लागली.

इ.स. १९१५ मध्ये मॅक्लेगन समितीने नागरी सहकारी पतंस्थेचे नागरी सहकारी संस्थामुळे दुर्बल घटकांचा विकास शक्य आहे. असे महत्त्वाचे प्रतिपादन केले. परिणामी सावकारी पाशातून सुटण्याचा नागरी सहकारी बँक हा महत्त्वाचा मार्ग म्हणून या बँकांची स्थापना होऊ लागली. बँकांच्या राष्ट्रीयकरणानंतर मात्र नागरी सहकारी बँकोच्या संख्येत वाढ होण्यास सुरुवात झाली. समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल वर्ग, रोजदारी वर्ग, लघुउद्योजक व छोटे व्यावसायीक इ.च्या आर्थिक अडचणी व त्यांच्या वाढत्या अर्थसाहय्याची मागणी यामुळे शहरी व ग्रामीण भागातील सदरील लोकांच्या भांडवल विषयक गरजा भागविण्यासाठी नागरी सहकारी बँका प्रभावी साधन ठरु लागल्या आहेत.

मराठवाडयात १९८०-८१ मध्ये १३ नागरी सहकारी बँका होत्या त्यानंतर २००८-०९ च्या आकडेवारीनुसार मराठवाडयात एकूण ९६ नागरी सहकारी बँका होत्या. २०१० मध्ये नागरी सहकारी बँकांची संख्या प्रकर्षाने घटलेली दिसून येते. मराठवाडयाच्या अधिकोषण प्रणालीमध्ये १९९५ साली अहमदपूर येथे स्थापन झालेल्या महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. अहमदपूर ची भर पडली. २०१३-१४ पर्यंत ६२५.९८ लाख रु. स्वनिधी, १४५५४.९९

लाख रु. ठेवी आहे. आणि ८९२६.३७ लाख रु. इतका पतपुरवठा वाढलेला आहे. मराठवाडयाच्या अधिकोषण प्रणालीत याबँकेने मोलाचे योगदान दिलेले आहे.

- **अध्ययन विषयाची निवड:**

महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. अहमदपूर बँकेची स्थापना अहमदपूर व आसपासच्या भागांचा विकास करण्याच्या हेतूने झाली. जे स्वत:चा विकास स्वत: घडविण्यावर विश्वास ठेवतात. अशा मित्रांना एकत्र करुन मा. श्री. बाळासाहेब जाधव यांनी सन १९९५ मध्ये केली. गेल्या दीड दशकामध्ये या बँकेनी नेत्रदिपक प्रगती केलेली आहे.

बँकेच्या शाखेमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. बँकांच्या शाखा अहमदपूर, जळकोट, औरंगाबाद, नांदेड, उदगीर, लातूर-१,२, कळंब, नळेगाव, औसा या १० ठिकाणी बँकेनी शाखा उभारलेल्या आहेत. लघुउद्योग, कुटीरउद्योग, व्यवसाय, गृहकर्ज इ.साठी बँकेने भरघोस पत पुरवठा केलेला आहे. मराठवाडयाच्या अधिकोषण प्रणालीत महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूरचे स्थान इतर बँकांच्या तुलनेत कुठे आहे. व त्यात आर्थिक सुधारणामुळे झालेला बदल अजमावण्यासाठी या अध्ययन विषयाची निवड केली आहे.

- **अध्ययन विषयाचे महत्त्व :**

कोणत्याही देशाच्या विकासाचा केंद्रबिंदु बँका असतात. एखादा देश आर्थिकदृष्टया संपन्न असूनही समाजातील तळागाळातील लोक हालाखीचे जीवन जगत असतील तर संपन्नता ती अनेकांच्या दु:खाचे कारण ठरणारी व मोजक्या लक्ष्मी पुत्रांची चंगळ करणारी होईल. यावर उपाय म्हणून जर बँका देशात मोठया प्रमाणात असतील तर मध्यमवर्गीय लोकांना बचतीची सवय लागून या बचती बँकेत जमा होऊन बँकेत ठेवीचे प्रमाण वाढते तसेच बँकेत ठेवी जास्त असतील तर लोकांना कर्ज वाटप मोठया प्रमाणात केली जातात. अशाच बँकांमधील महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूर एक अग्रणी बँक आहे. तसेच या बँकेच्या शाखा, ठेवी, कर्ज व्यवहार यांची सविस्तर माहिती आपल्याला व इतरांना

या बँकेच्या अभ्यासातून कळण्यास मदत होईल. पूर्वी लोक फक्त उद्योग-धंद्यासाठी, शेतीसाठी आणि घरगुती कारणासाठीच कर्ज घेत परंतु घेत परंतु आज दैनंदिन कारणासाठी देखील कर्ज घेत आहेत. अशा विविध दैनंदिन कारणासाठी बँक कर्ज पुरवठा करत आहे. म्हणून ही बँक या क्षेत्रात आज आघाडीवर आहे तसेच बँकेला देखील तिच्या कारभारातील त्रुटी या अभ्यासातून निश्चित स्वरुपात कळतील आणि भविष्यात बँकींग क्षेत्रात होऊ घातलेले बदल या बँकेला आत्मसात करण्यास सदरील अभ्यास मदत करील.

- **अध्ययन विषयाची उद्दष्टे :**

१. मराठवाडयाच्या अधिकोषण प्रणालीत महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूर च्या कार्याचा संक्षिप्त आढावा घेणे.

२. मराठवाडयाच्या अधिकोषण प्रणालीत महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूर शाखानिहाय ठेवीच्या प्रवृत्तीचे अध्ययन करणे.

३. मराठवाडयाच्या अधिकोषण प्रणालीत महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूर कर्ज वाटप, थकबाकी यांचे अध्ययन करणे.

४. मराठवाडयाच्या अधिकोषण प्रणालीत महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूरच्या नफा-तोटा यांचे अध्ययन करणे.

५. मराठवाडयाच्या अधिकोषण प्रणालीत महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूरच्या लाभार्थीचे मनोगत अजमावणे.

- **अध्ययन विषयाची गृहिते :**

१. मराठवाडयाच्या अधिकोषण प्रणालीत महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूरच्या प्रगतीत कुशल व्यवस्थापक आणि कर्मचारी यांचा सहभाग अधिक महत्त्वाचा आहे.

२. मराठवाडयाच्या अधिकोषण प्रणालीत महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूर या बँकेच्या शाखांवर लोकांचा विश्वासार्हता आहे.

३. मराठवाडयाच्या अधिकोषण प्रणालीत महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूरच्या ठेवी, भागभांडवल व दिलेले कर्ज यांच्या प्रमाणात सातत्याने वाढ होत आहे.
४. अलिकडील काही वर्षात बँकेची थकबाकी वाढत असल्याचे दिसत आहे.
५. मराठवाडयाच्या अधिकोषण प्रणालीत महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूर निष्क्रिय मालमत्ता (NPA) शुन्य टक्के ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

- **संशोधन पध्दती :**

प्रस्तुत अभ्यास विषय प्राथमिक व द्वितीय साधन सामग्रीवर आधारलेला आहे. अभ्यासाच्या विश्लेषणासाठी व्यष्टी अध्ययन पध्दती निवडण्यात आली आहे. प्रस्तुत अभ्यास विषयात मराठवाडयातील लातूर, औरंगाबाद व नांदेड तीन जिल्हयातील बँकेच्या शाखांचा अभ्यास करावयाचा आहे. तसेच बँकेनी केलेल्या कार्याचे गणन वा मापन करण्यासाठी सांख्यिकी पध्दत उपयोगात येते. या पध्दतीच्या माध्यमातून संस्थेला गुणात्मक रुप देण्याचा प्रयत्न केला जातो. अध्ययन विषयाचे वर्गीकरण करण्यासाठी ही पध्दत उपयुक्त ठरते. अध्ययन विषयाच्या विश्लेषणासाठी माध्य (Mean) व प्रमाप विचलन (S.D.) या सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येईल. व लाभार्थ्यांचे मनोगत अजमावण्यासाठी प्रश्नावली व परिशिष्ट याद्वारे माहिती जमा केली जाईल.

- **माहितीचे स्त्रोत :**

मराठवाडयाच्या अधिकोषण प्रणालीत महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदपूर माहितीसाठी पुढील घटकाचा समावेश होतो.

प्राथमिक स्त्रोत :

यामध्ये मुलाखत, अवलोकन पध्दत व प्रश्नावली यांसारख्या प्राथमिक स्त्रोतांचा उपयोग करण्यात येणार आहे.

द्वितीय स्त्रोत :

यामध्ये बँकेचे वार्षिक अहवाल, शासकीय प्रकाशने, महाराष्ट्र राज्य सहकारी असो. मुंबई, महाराष्ट्र सहकारी चळवळ एक दृष्टिक्षेप सहकार आयुक्त, निबंधक सहकारी संस्था, पुणे यांची विविध प्रकाशने, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचनाचे वार्षिक अहवाल, तसेच सहकारी चळवळीशी संबंधित अहवाल, मासिके, वर्तमानपत्रे, अध्ययन विषयाशी निघडीत ग्रंथ इ. सामग्रीचा आधार घेण्यात येईल.

- **संशोधकाची साधने :**

सर्वेक्षण डायरी, अपेक्षित ठिकाणी भेटी, पोस्ट, टेलिफोन व मोबाईल तसेच गणकयंत्र, फोटोग्राफी फॅक्स, इंटरनेट इ. साधनांचा अवलंब करण्यात येईल.

- **प्रकरणाची रुपरेषा :**

प्रकरण पाहिले - प्रस्तावना

प्रकरण दुसरे - मराठवाडयातील अधिकोषण प्रणाली

प्रकरण तिसरे - संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण चौथे - बँकेच्या ठेवी आणि ठेवीचे प्रकार

प्रकरण पाचवे - कर्ज पुरवठयाचे आर्थिक विश्लेषणात्मक अभ्यास

प्रकरण सहावे - बँकेची आर्थिक स्थिती व थकबाकीचा अभ्यास

प्रकरण सातवे - निष्कर्ष आणि शिफारशी

- **संदर्भ सूची :**

१. सामाजिक संशोधन पध्दती - डॉ. बी.एम. कराडे

२. सामाजिक संशोधन पध्दती- पु.ल. भांडारकर

३. सहकाराचे मूलतत्त्वे - व्ही.टी. चौगुले, पठाण.

४. सहकार तत्त्व व व्यवस्थापन- डॉ. गो.स. कामत

५. बँक व्यवसाय व वित्त- डॉ. बी.बी. पहुरकर

६. भारतीय बँक प्रणाली - मुकुंद महाजन

७. बँकींग - डॉ. के. के. पाटील, सोंडगे

८. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या, पुणे - महाराष्ट्र राज्य

९. सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे - सहकार आयुक्त निबंधक.

१०.महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल - २००५- ते २०१४

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. रमेश साळी

अर्थशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक,

भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर

ता. चाकूर, जि.लातूर-४१३५४४

संशोधक

श्री .सचिन मारोतीराव म्हैसलवार

लातूर